**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र. आरटीएस/अपील/१२१/२०२३

दिनांक-२८.०३.२०२५

**प्रति,**

१. रुपा हणमंत गुंडी
२. नंदिणी हमणंत गुंडी अपाक आई रुपा
३. शंकुतला सदाशिव पाटील
रा. निडोणी, ता. बबलेश्वर,
जि. विजयपुर (कर्नाटक राज्य) ५८६११३ **.... अपिलार्थी**

**विरुध्द**

१. शांतव्वा आणाप्पा हद्दार
रा. कोळीगुड्ड, ता. रायबाग,
जि. बेळगावी (कर्नाटक राज्य) ५९१२२० **..... जाबदार**

## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे

**वाद मिळकतीचा तपशिल**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाबाबतचा फेरफार नंबर |
|---|---|---|---|---|---|
| उमराणी | जत | १२६८ | ०३ हे ८२ आर<br>पो.ख. ० हे ०० आर | १ हे ५० आर | १०३२० |

**निकालपत्र**

मौजे उमराणी, ता.जत येथील उक्त वाद मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, जत यांनी फेरफार नंबर १०३२० दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये आरटीएस अपील या न्यायालयात दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. मंडळ अधिकारी, जत यानी कायदा न्यायबुध्दी व सद्सद्विवेकबुध्दी यांना धरुन नसुन, कायदाचा अभ्यास न करता फेरफार मंजूर केले आहे. सदर नोंद संपूर्णपणे बेकायदेशिर आहे. मंडळ अधिकारी, जत यानी जे महत्वाचे मुद्दे व मुलगामी व कायदेशिर होते ते मनापुठे ठेवुन विचारात घेतले नाहीत.

२. वाद मिळकत मौजे उमराणी. ता जत. जि. सांगली येथील शेत मिळकत गट क्रमांक १२६८, क्षेत्र हे. ०३ ८२.०० आर, पोट खराब हे. ०० ००.०० आर, आकार रु. ०२ ६७ पैसे या पैकी क्षेत्र हे. ०१ ७०.०० आर, पोट खराब हे. ०० ००.०० आर, आकार रु. ०२ - ६७ पैसे ईतकी शेत जमीन मयत हणमंत मलाप्पा गुंडी यानी श्री.केदारी रामगोंडा भिरडी, व महादेव रामगोंडा भिरडी दोघे रा. उमराणी ता.जत जि.सांगली यांच्याकडून दिनांक १७.०४.२०१० रोजी रक्कम रुपये ८५,०००/- ला नोंदणीकृत खरेदी दस्त नंबर १३६८/२०१० ने खुष खरेदी घेतले आहे. सदर खरेदी दस्ताने मयत हणमंत मलाप्पा गंडी यांच नाव फेरफार नंबर ४२६९ ने सातबारा अभिलेखपत्रामध्ये नाव नोंद झाले आहे. याबाबत मंडळ अधिकारी, जत यानी कोणताही कागदपत्रे न पाहता आदेश पारीत केले आहे. सदर आदेश संपूर्णपणे बेकायदेशिर आहे.

३. सुमित्रा मल्लाप्पा गुंडी हि दिनांक २४.०८.२०२२ रोजी मयत झाल्याने, जाबदार हिने दिनांक १४.०९.२०२२ रोजी कै.सुमित्रा मल्लाप्पा गुंडी हिचे कायदेशिर वारसा करीता अर्ज दिला होता. सदर अर्जानुसार मंडळ अधिकारी, जत यानी बेकायदेशिर फेरफार नंबर १०३२० चा फेरफार नोंद मंजूर केले आहे. सदर फेरफार नोंद मंजूर करणेपूर्वी कायदेशिर कागदपत्रे व हिंदु वारसा कायदेचा अभ्यास केला नाही. सबब मंडळ अधिकारी, जत यांचा आदेश संपूर्णपणे बेकायदेशिर आहे.

**जाबदार यांना वारंवार संधी देऊनदेखील जाबदार हे सुनावणीसाठी उपस्थित राहिलेली नाहीत तसेच त्यांनी लेखी अथवा तोंडी म्हणणे सादर केलेले नाही.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. अपिलार्थी यांनी सदरचे अपील हे मंडळ अधिकारी जत यांनी प्रमाणित केलेल्या फेरफार क्रमांक १०३२० च्या नोंदीविरुद्ध दाखल केले आहे. सदर फेरफाराने मौजे उमराणी येथील गट नंबर १२६८ या मिळकत सदरी मयत सुमित्रा यल्लाप्पा गुंडी यांचे वारस म्हणून अपिलार्थी व जाबदार यांची नोंद घेण्यात आली आहे.

२. प्रकरणी उपलब्ध पुरावेचे कागदपत्र यांचे अवलोकन केले असता वाद मिळकत ही अपिलार्थी क्रमांक १ यांचे पती हनुमंत मल्लाप्पा गुंडी यांची स्वकष्टार्जीत मिळकत होती. हनुमंत मल्लाप्पा गुंडी हे यांचे मृत्यूनंतर फेरफार क्रमांक ८४९८ अन्वये अपिलार्थी क्रमांक १ व २ सोबतच सुमित्रा मल्लाप्पा गुंडी यांचे नाव वारस म्हणून नोंदविण्यात आले आहे. तदनंतर सुमित्रा मल्लाप्पा गुंडी या मयत झालेनंर त्यांचे सर्व कायदेशीर वारसांची नोंद सातबारा सदरी फेरफार क्रमांक १०३२० अन्वये नोंद करणेची मंडळ अधिकारी जत यांची कृती योग्य व कायदेशीर असून त्यात बदल करणे आवश्यक नसल्याने अपील फेटाळण्यात येत आहे.

३. विलंबाबाबत म्हणावे तर ०५ महिने ०९ दिवस विलंब माफ करावे असे कोणतेही कारण विलंब माफ अर्जात नाही. मुळात अपिलार्थी यांची अपिल अर्जातील मागणी ही दिवाणी स्वरूपाची आहे. त्यासाठी त्यांनी दिवाणी न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही संयुक्तिक कारण नसतांना केलेला विंलब अर्ज कायदयाचे कसोटीवर टिकू शकत नाही. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील विलंब माफ अर्जाचे मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

सदर आदेशाचा अंमल अपिल कालावधिनंतर करणेत यावा.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

**(अजयकुमार नष्टे)**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक - २८.०३.२०२५

प्रत - तहसिलदार जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.